मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# ‘ॲप’द्वारे खड्ड्यांची तक्रार शक्य, महापालिकेचा उपक्रम

## खड्डे व्यवस्थापनासाठी ‘पॉटहोल मॅनेजमेंट ॲप’ विकसित केले : नागरिकांना या ॲपद्वारे खड्ड्यांची तक्रार नोंदविता येणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेने खड्डे व्यवस्थापन प्रणाली विकसित केली आहे. या अंतर्गत ‘पॉटहोल मॅनेजमेंट’ हे ‘ॲप’ विकसित करण्यात आले असून, नागरिकांना या ॲपद्वारे खड्ड्यांची तक्रार नोंदविता येणार आहे.

महापालिकेची पावसाळापूर्व कामांची तयारी सुरू आहे. पावसाळ्यामध्ये खड्ड्यांची समस्या सातत्याने उद्भवते. या समस्येवर उपाय म्हणून महापालिकेने ‘पॉटहोल ॲप’ विकसित केले आहे. या ॲपमुळे खड्ड्यांची तक्रार नोंदवण्याची आणि त्या तक्रारींचे निराकरण करण्याची प्रक्रिया सोपी आणि सुलभ होणार आहे. नागरिक या ॲपद्वारे खड्ड्याची तक्रार नोंदवू शकतात आणि तिच्या निराकरणाविषयी अद्ययावत माहिती मिळवू शकतात.




ॲपद्वारे खड्ड्याची तक्रार नोंदविण्यासाठी नागरिकांना पॉटहोल ॲपमध्ये लॉग-इन करावे लागणार आहे. त्यानंतर नागरिक खड्ड्याचे छायाचित्र काढून त्याच्या स्थानासह ते अपलोड करू शकतात. ही माहिती आपोआप संबंधित विभागातील कनिष्ठ अभियंत्यांना त्यांच्या प्रभागानुसार पाठवली जाईल. त्याच वेळी ती माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांनाही पाठवली जाईल. तक्रार नोंदवल्यानंतर तिचे निराकरण करण्यासाठी ती संबंधित अधिकाऱ्याकडे दिली जाईल. दिलेल्या तक्रारीचे निराकरण झाले नाही, तर त्या भागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांना ई-मेल आणि संदेश पाठवण्यात येईल. एखादी तक्रार कनिष्ठ अभियंत्यांच्या अधीन नसल्यास ती महापालिकेच्या ज्या विभागाशी संबंधित आहे, त्या विभागाकडे पाठवण्यात येईल. तक्रारीचे निराकरण संबंधित विभाग किंवा अभियंता यांनी केल्यानंतर ती तक्रार ॲपमध्ये बंद केली जाईल आणि तक्रारदारास छायाचित्रासह निराकरणाची माहिती ई-मेल, संदेशाद्वारे कळवली जाईल, असे महापालिकेच्या स्थापत्य विभागाने सांगितले.

### तक्रार कशी नोंदविता येईल?

» मोबाइलमध्ये लोकेशन सर्व्हिस सुरू करावी. त्यावर क्लिक करून सध्याचे लोकेशन पाहावे. नकाशावर खड्ड्याचे स्थान निवडावे. जवळचा ओळखण्याजोगा पत्ता, संदर्भ द्यावा. कमी खोल खड्डा, खोल खड्डा, चेंबर, त्याची अंदाजे लांबी व रुंदी मीटरमध्ये लिहावी. खड्ड्याचे स्पष्ट छायाचित्र अपलोड करावे. त्यानंतर तक्रार ‘सबमिट’ करावी. एक विशिष्ट तक्रार क्रमांक देण्यात येईल. काम पूर्ण झाल्यानंतरचे छायाचित्र आणि काम पूर्ण झाल्याचा अहवाल तक्रारदाराला नोंदणीकृत ई-मेलवर पाठवला जाईल

“ शहरातील रस्ते खड्डेमुक्त असावेत, यासाठी महापालिका सातत्याने प्रयत्नशील आहे. नागरिकांनादेखील रस्त्यांवरील खड्ड्यांची तक्रार सहज करता यावी, यासाठी खड्डे व्यवस्थापन प्रणाली सुरू करण्यात येत आहे. खड्डे व्यवस्थापन प्रक्रियेमध्ये पारदर्शकता, जबाबदारी आणि कार्यक्षमतेची वाढ करून रस्ते अधिक सुरक्षित आणि सुरळीत करण्याचा प्रयत्न आहे..

**- शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

# पिंपरी-चिंचवड महापालिकेने केली १६ कोटींची औषधखरेदी

## महापालिका रुग्णालयांसाठी ॲलोपॅथिक औषधे, रुग्णांसाठी हाडांच्या शस्त्रक्रियेबरोबरच अन्य विविध शस्त्रक्रियांसाठी लागणाऱ्या साहित्याचा समावेश

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेच्या वैद्यकीय विभागाकडून दोन वर्षांच्या कालावधीसाठी एकूण १६ कोटी ३६ लाख ७८ हजार ९१६ रुपयांची औषधे व शस्त्रक्रियेसाठी लागणारे साहित्य खरेदी करण्यात येणार आहे. यामध्ये ॲलोपॅथिक औषधे, महात्मा जोतीराव फुले जनआरोग्य योजनेंतर्गत समाविष्ट रुग्णांसाठी हाडांच्या शस्त्रक्रियेबरोबरच अन्य विविध शस्त्रक्रियांसाठी लागणाऱ्या साहित्याचा समावेश आहे. २०२५ ते २०२७ या दोन वर्षांच्या कालावधीकरिता ही औषध व साहित्य खरेदी केली जाणार आहे.



पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वैद्यकीय विभागामार्फत नागरिकांना २१ दवाखाने, ७ रुग्णालये व १ सर्वोपचार रुग्णालय असलेल्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयामध्ये विविध प्रकारच्या वैद्यकीय सेवा पुरविल्या जातात. यामध्ये रुग्णालय नोंदणी, जन्म-मृत्यू नोंदणी, राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम, रक्तपेढी सेवा, रुग्णवाहिका अशा विविध सेवा पुरविल्या जातात.

### वर्षभरात 16 लाखांहून अधिक रुग्णांवर उपचार

» दर्जेदार वैद्यकीय उपचारांमुळे महापालिकेच्या सर्व रुग्णालये व दवाखान्यांमध्ये दर वर्षी सुमारे १६ लाख १० हजार ०४२ रुग्ण बाह्यरुग्ण विभागाचा लाभ घेत असून, आंतररुग्ण सेवांचा लाभ ८९ हजार ४१७ रुग्णांनी घेतला आहे. तर, ८२ हजार १२२ रुग्णांनी सोनोग्राफीचा लाभ घेतला असून, ३३ हजार १०७ रुग्णांवर विविध प्रकारच्या शस्त्रक्रिया केल्या आहेत. तर ६ हजार १३४ रुग्णांनी आयसीयू तर ३ हजार ६५१ रुग्णांनी एनआयसीयू सेवेचा लाभ घेतला आहे.

### शस्त्रक्रियांकरिता साडेपाच कोटींचा खर्च

» महात्मा जोतीराव फुले जनआरोग्य योजनेंतर्गत समाविष्ट रुग्णांसाठी हाडांच्या शस्त्रक्रियांकरिता ६ कोटी ८ लाख ९५ हजार ९२२ रुपये खर्च केले जाणार आहेत. तर शस्त्रक्रियांकरिता आवश्यक असलेल्या विविध साधनांसाठी ५ कोटी ५६ लाख ९२ हजार १४९ रुपये खर्च केले जाणार आहेत.

# मोठ्या सोसायट्यांच्या सांडपाण्याने वस्ती हैराण

## महापालिकेकडून कायमस्वरूपी पावले उचलली जात नसल्याचा स्थानिकांचा आरोप

**पुणे | प्रतिनिधी**

कोरेगाव पार्क परिसरातील मडारी वस्तीत सध्या पावसाच्या पाण्याचा नाही, तर थेट सांडपाण्याचा पूर येतोय! येथील स्थानिकांच्या घरात दर वर्षी पावसाळ्यात मोठ्या सोसायट्यांचे सांडपाणी घुसते. त्यामुळे अस्वच्छ व आरोग्यास धोकादायक परिस्थितीत जीवन जगण्याची वेळ येथील नागरिकांवर येतेय.

स्थानिकांनी सांगितले की, घोरपडी परिसरातील सोसायट्यांचे सांडपाणी जवळच्या रेल्वे पुलाखालून जाणाऱ्या नाल्यातून मडारी वस्तीत थेट शिरते. मडारी वस्तीत राहणारे कारी जमिल यांनी सांगितले, “दरवर्षी पावसाळ्यात आमच्या वस्तीत सांडपाणी घरात घुसते. काही घरांची पातळी अत्यंत खालच्या स्तरावर असल्यामुळे हे पाणी थेट बाथरूममध्ये साचते. त्यामुळे संपूर्ण घर अस्वच्छ होऊन जाते. लहान मुलांना डेंग्यू, मलेरिया यासारख्या गंभीर आजारांनी ग्रासले आहे. लोक सतत खोकला, ताप या व्याधींनी त्रस्त आहेत.”



### ‘साइट व्हिजिट’चा देखावा, समस्या मात्र कायम

» दिनांक २६ मे २०२५ रोजी महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी मडारी वस्तीला भेट देऊन नाल्यांची सफाई केली. पण स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, ही केवळ तात्पुरती धूळफेक आहे. नाले पूर्णपणे स्वच्छ होत नाहीत आणि पावसाळ्यात पुन्हा घरात पाणी शिरणार आहे. साईट व्हिजीटचा देखावा केला जातो. मात्र आमच्या समस्या तशाच कायम राहतात.

कारी जमिल पुढे म्हणाले, “महापालिकेने दिनांक २६ मे २०२५ रोजी नाल्याच्या चेंबरची सफाई केली खरी, पण हे तात्पुरतेच आहे. आमच्या भागासाठी स्वतंत्र आणि कार्यक्षम ड्रेनेज लाईन असायला हवी. घोरपडीतील नाल्याची सांडपाणी वाहून नेणारी लाईन खूपच अरुंद आहे, ती रुंद आणि नियमितपणे स्वच्छ केली पाहिजे.”

मडारी वस्तीत राहणाऱ्या आणखी एका व्यक्तीने नाव न सांगण्याच्या अटीवर सांगितले, “आमच्या भागात ड्रेनेज चेंबर कायमच कचरा आणि सांडपाण्याने भरलेले असतात. पावसामुळे हे प्रमाण अधिक वाढणार आहे. आमचे बाथरूम वापरण्यास अयोग्य झाले की दुसऱ्यांच्या बाथरूमचा वापर करावा लागतो. आम्ही १५-२० जण एकत्र राहतो. किती वर्षं आम्ही असे घाणीत जगायचे?”

पुणे महापालिकेला पाठवलेल्या तक्रारीत लिहिले आहे की, “मडारी वस्तीतले रहिवासी अत्यंत दयनीय आणि अस्वच्छ परिस्थितीत राहात आहेत. मागील काही दिवसांतील मुसळधार पावसामुळे संपूर्ण ड्रेनेज यंत्रणा कोलमडली आहे. त्यामुळे सांडपाणी थेट घरात शिरतेय. लहान मुले, महिला आणि वृद्धांना दररोज घाणीतून चालावे लागते. परिसरात दुर्गंधी पसरली आहे. अनेकांना ताप, सर्दी, त्वचारोग होत आहेत. आता प्रश्न असा आहे की, आम्ही जगायचं का मरायचं?”

कोरेगाव पार्क परिसरातील मडारी वस्तीत सध्या पावसाच्या पाण्याचा नाही, तर थेट सांडपाण्याचा पूर येतोय! येथील स्थानिकांच्या घरात दर वर्षी पावसाळ्यात मोठ्या सोसायट्यांचे सांडपाणी घुसते. त्यामुळे अस्वच्छ व आरोग्यास धोकादायक परिस्थितीत जीवन जगण्याची वेळ येथील नागरिकांवर येतेय. ड्रेनेज विभागाच्या कनिष्ठ अभियंता सोनाली जाधव म्हणाल्या, मडारी वस्तीत नाल्यांचे ब्लॉकेजेस, कचरा वगैरे हटवले आहेत. काही घरांची उंची खूपच कमी आहे, त्यामुळे सांडपाणी आत शिरते. मात्र, आम्ही या भागासाठी कायमस्वरूपी उपाययोजनांवर काम करत आहोत.”

### महापालिकेकडे चार मुख्य मागण्या

» सांडपाणी घरात शिरणार नाही अशा कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात.
» नाल्यांची तत्काळ सफाई व दुरुस्ती करावी.
» मडारी वस्तीत तत्काळ भेट देऊन पाहणी करावी.
» दीर्घकालीन आणि शाश्वत नियोजन राबवावे.

### समस्या कायमस्वरूपी सोडवण्याचा प्रयत्न

» महापालिकेच्या ड्रेनेज विभागाच्या कनिष्ठ अभियंता सोनाली जाधव म्हणाल्या, “दिनांक २६ मे २०२५ रोजी मडारी वस्तीत नाल्यांचे ब्लॉकेजेस, कचरा वगैरे हटवले आहेत. काही घरांची उंची खूपच कमी आहे, त्यामुळे सांडपाणी आत शिरते. मात्र, आम्ही या भागासाठी कायमस्वरूपी उपाययोजनांवर काम करत आहोत.”

# बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर पोलिसांकडून बैठकीचे आयोजन

## सामाजिक सलोखा आणि शांतता राखण्यासाठी पोलिसांचा पुढाकार

**पुणे | प्रतिनिधी**

आगामी बकरी ईद सणाच्या पार्श्वभूमीवर सामाजिक सलोखा आणि शांतता राखण्यासाठी शहर पोलिसांनी पुढाकार घेतला आहे. परिमंडळ पाचचे उपायुक्त डॉ. राजकुमार शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली याबाबत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीस सर्व मशिदींचे मौलाना, ट्रस्टी, कुरेशी समाजाचे प्रतिनिधी, पुणे महानगरपालिकेचे अधिकारी, पुणे कॅन्टोन्मेंटचे अधिकारी आणि कत्तलखान्याचे मुकादम उपस्थित होते.

या बैठकीत सण-उत्सवाच्या काळात येणाऱ्या अडचणींवर सविस्तर चर्चा करण्यात आली. मशिदींवरील भोंगे, कुर्बानी, प्राण्यांची अवैध वाहतूक, बकरा बाजार, अवैध कत्तलखाने आणि वाहतूक समस्या यांसारख्या विविध मुद्द्यांवर चर्चा झाली. या बैठकीला परिमंडळ पाच मधील हडपसर आणि वानवडी विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त, ९ पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, महापालिकेचे अधिकारी, तसेच हद्दीतील मौलाना, ट्रस्टी आणि कुरेशी समाजाचे सुमारे ७० ते ८० प्रतिनिधी उपस्थित होते



> “बैठकीला उपस्थितांनी त्यांच्या समस्या मांडल्या. त्यांच्या अडीअडचणी समजून घेऊन विविध मुद्द्यांवर सकारात्मक चर्चा केली. तसेच शासनाने दिलेल्या सूचना आणि मार्गदर्शक तत्त्वे उपस्थितांना समजावून सांगितली.
> - डॉ. राजकुमार शिंदे, पोलीस उपायुक्त, परिमंडळ पाच

बकरी ईद सणाच्या पार्श्वभूमीवर पुणे शहरात शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी या बैठकीत महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा झाली. जनावरांची अवैध वाहतूक रोखण्यासाठी शहरात चेकनाके लावले जाणार आहेत. तसेच जनावरांच्या अवैध वाहतुकीवर पोलिसांकडून बारीक नजर ठेवली जाणार आहे. तसेच, कत्तलखाने नियमांनुसारच चालतील आणि कोणत्याही प्रकारे बेकायदेशीर कृत्य होणार नाही याची खात्री केली जाणार आहे. बकरी ईदपूर्वी भरणाऱ्या 'बकरा बाजारांत' विक्री करणाऱ्यांनी पोलीस आणि महापालिकेच्या संबंधित विभागांकडून परवानग्या घेणे बंधनकारक आहे. तसेच, समाज माध्यमांवर चुकीची माहिती पसरवून सामाजिक सलोखा बिघडणार नाही, याची काळजी पोलिसांकडून घेतली जाणार आहे.

# मुंबई-बंगलोर महामार्गाची' होतेय तुंबई'...

## पाण्याचा निचरा होत नसल्याने वाकड, ताथवडे, पुनावळे सेवा रस्त्यावर पाणी, वाहतूक कोंडीसह चालकांना मनस्ताप

**पिंपरी | प्रतिनिधी**

मुंबई-बंगलोर महामार्गालगत असलेले दहा नैसर्गिक नाले हे काही बांधकाम व्यावसायिकांकडून पाईप टाकून बुजविले आहेत. शहरात मुसळधार पडणा-या पाऊसामुळे आणि गटाराचे सांडपाण्याचा योग्य निचरा होत नसल्याने महामार्गावर आणि सेवा रस्त्यावर प्रचंड पाणी साचून राहत आहे. मागील काही वर्षांत पावसाळ्यात दरवर्षी पाण्याचा निचरा होत नसल्यानेच तुंबई होऊ लागली आहे. यामुळेच हिंजवडी आयटी पार्कलगत वाकड, पुनावळे, ताथवडे परिसरात मोठ्या प्रमाणात पाणी साचून वाहतूक कोंडी होत नागरिकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. याबाबत महापालिकेला एनएचएआयकडून पत्र देत महामार्गाच्या दोन्ही बाजुने झालेल्या बांधकामामुळे हे नैसर्गिक नाले पूर्णत: बुजविले असून पावसाचे पाणी व गटारांचे सांडपाणी नैसर्गिक नाल्यात अथवा पर्यायी व्यवस्थेत सोडण्यात यावे, असे एनएचएआयने म्हटले आहे.

मुंबई-बंगलोर महामार्ग आणि हिंजवडी आयटी पार्कमुळे वाकड, ताथवडे, पुनावळे अंडरपासच्या चोहोबाजूला शेकडो सदनिकांचे गृहप्रकल्प उभारले गेले आहे. या भागात नागरीकरण वाढले असून लाखो नागरिक वास्तव्य करतात. राष्ट्रीय महामार्गावरून पुणे-मुंबईसह इतर राज्यात जाणाऱ्या मोठ्या वाहनांची वर्दळ सतत असते. तर, आयटी पार्कमधील नोकरदार व परिसरातील रहिवाश्यांना सेवा रस्ता, तसेच ताथवडे, पुनावळे आणि भुमकर चौकातील अंडरपासमधून ये-जा करावी लागते. सततच्या पावसाने महामार्गावर प्रचंड वाहतूक कोंडी होत आहे.

बांधकामे वाढत असताना हिंजवडी आयटी पार्कलगत वाकड, पुनावळे, ताथवडे परिसरात नैसर्गिक नाले बंद झाले आहेत. पावसाळ्यात पाण्याचा निचरा होत नसल्याने पाणी ठिकठिकाणी साचत आहे.



### महामार्गालगतचे तब्बल १० नैसर्गिक नाले बंद

» वाकड, ताथवडे व पुनावळे या भागातील महामार्गाच्या लगत सेवा रस्त्यांवरील एकूण १० नैसर्गिक नाल्यांसाठी सिमेंट नळ्या टाकून पूल बांधण्यात आले. परंतु, महामार्गाच्या दोन्ही बाजुने झालेल्या बांधकामामुळे हे पूल पूर्णत: बुजविले गेल्याने नाले बंद झाल्याचा दावा एनएचएआयने केला आहे. तसेच, पावसाचे पाणी व गटारांचे सांडपाणी सेवा रस्त्यावर येवून या भागात वाहतुकीस अडथळा निर्माण होतो. त्यामुळे पावसाचे पाणी व गटारांचे सांडपाणी नैसर्गिक नाल्यात अथवा पर्यायी व्यवस्थेत सोडण्यात यावे, असे 'एनएचएआय'च्या कार्यकारी अभियंत्यांनी पत्राव्दारे २१ मे २०२५ रोजी पिंपरी महापालिकेला कळविले आहे.

### महामार्गालगतचे १० नैसर्गिक नाले बंद

» वाकड, ताथवडे व पुनावळे या भागातील महामार्गाच्या लगत सेवा रस्त्यांवरील एकूण १० नैसर्गिक नाल्यांसाठी सिमेंट नळ्या टाकून पूल बांधण्यात आले. परंतु, महामार्गाच्या दोन्ही बाजुने झालेल्या बांधकामामुळे हे पूल पूर्णत: बुजविले गेल्याने नाले बंद झाल्याचा दावा एनएचएआयने केला आहे. तसेच, पावसाचे पाणी व गटारांचे सांडपाणी सेवा रस्त्यावर येवून या भागात वाहतुकीस अडथळा निर्माण होतो. त्यामुळे पावसाचे पाणी व गटारांचे सांडपाणी नैसर्गिक नाल्यात अथवा पर्यायी व्यवस्थेत

> "मुंबई-बंगलोर महामार्गाखालून पाणी जाण्याची व्यवस्था एनएचआयएकडून केलेली नाही. त्यामुळे हे पाणी महामार्गाच्या एका बाजुला साचते. महामार्गावर व सर्व्हिस रस्त्यावर पाणी साचू नये. तसेच नागरिकांना त्रास होणार नाही. यासाठी येथील काही नाले जोडण्याचे काम सुरु आहे. तेथे पाणी थांबवणार नाही, याची काळजी घेतली जात आहे."
>
> **- देवन्ना गट्टूवार, सहशहर अभियंता, महापालिका**

# शहरात अनधिकृत प्लॉटिंगच्या जागांवर बेकायदा बांधकाम सुरू

## अनधिकृत प्लॉटिंगमधून सामान्य नागरिकांची फसवणूक होत असल्याचे वास्तव समोर येत आहे

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील रुपीनगर, तळवडे, रावेत, च-होली आदी भागांत मोठ्या प्रमाणावर अनधिकृत प्लॉटिंगच्या जागांवर बेकायदा बांधकामे सुरू आहे. अनधिकृत प्लॉटिंगमधून सामान्य नागरिकांची फसवणूक होत असल्याचे वास्तव समोर येत आहे. नवीन उद्यास आलेल्या डेव्हलपर्सकडून आकर्षक जाहिराती, सुविधा आणि परवडणाऱ्या किंमतींचा गाजावाजा करून भूखंड विक्री केली जात आहे. प्रत्यक्षात मात्र ते भूखंड अधिकृत विकास आराखड्याबाहेरील असल्याचे नंतर ग्राहकांच्या लक्षात येते. मात्र तोपर्यंत नागरिकांची फसगत झालेली असते.

शहरात सध्या मोठ्या प्रमाणावर बांधकाम व्यावसायिक उदयास येत आहेत. अनेकजण बिल्डर असल्याचा केवळ देखावा करून प्लॉटिंगच्या नावाखाली पैसे उकळले जात आहेत. या डेव्हलपर्सकडून नागरिकांना बोगस व फसव्या जाहिराती दाखवून जागा विकल्या जातात. भूखंड खरेदी करताना 'रस्ते, वीज, पाणी, गटार' यांसारख्या सर्व सुविधा दिल्या जातील, असे आश्वासन दिले जाते. मात्र व्यवहार पूर्ण होताच हे कथित डेव्हलपर्स अंडरग्राऊंड होतात. ग्राहकांचे साधे फोनही उचलले जात नाहीत.

चिखली परिसरात नुकत्याच महापालिकेने अशाच प्रकारच्या अनधिकृत प्लॉटिंगवर उभारलेल्या ३६ अनधिकृत बांधकामांवर कारवाई करत ती पाडून टाकली. या कारवाईमुळे पुन्हा एकदा हे स्पष्ट झाले की, अशा प्रकारच्या व्यवहारांमध्ये गुंतलेल्यांची फसवणूक होत आहे. पिंपरी-चिंचवड शहरातील रुपीनगर, तळवडे, रावेत, च-होली आदी भागांत मोठ्या प्रमाणावर अनधिकृत प्लॉटिंगच्या जागांवर बेकायदा बांधकामे सुरू आहे. अनधिकृत प्लॉटिंगमधून सामान्य नागरिकांची फसवणूक होत असल्याचे वास्तव समोर येत आहे.




### बांधकामाला परवानगी मिळत नाही

» सर्वसामान्य नागरिकांनी आपली आयुष्यभराची गुंतवणूक करत हे प्लॉट खरेदी केले आहेत. त्यांना या भूखंडांवर घरे बांधता येतील अशी आशा असते. मात्र प्रत्यक्षात ही जागा ग्रीनझोन, रेड झोन, बफर झोन, ब्लू लाइनमध्ये असल्यामुळे ना बांधकाम परवानगी मिळते, ना सुविधा. त्यातच काही ठिकाणी नागरिक स्वतःहून बांधकाम करू लागल्याने महापालिका अनधिकृत बांधकामे पाडते आणि नागरिकांचे लाखो रुपयांचे नुकसान होते.

### खात्री करूनच घ्या प्लॉट

» सर्वतोपरी खातरजमा करूनच गुंतवणूक करावी, असा सल्ला बांधकाम तज्ज्ञांनी दिला आहे महापालिकेचे अतिक्रमण विभाग, बांधकाम परवाना विभाग व टाउन प्लॅनिंग विभाग यांच्याकडून आता अशा बनावट डेव्हलपर्स व प्लॉट विक्रेत्यांवर विशेष मोहीम राबवण्याची तयारी सुरू आहे. तरी नागरिकांनी अशा कोणत्याही जाहिरातीच्या भूलथापांना बळी न पडता काळजीपूर्वक व्यवहार करावेत, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# प्रांताधिकाऱ्यांच्या आदेशाला केराची टोपली

## शिरूर-गोलेगाव रोडवरील माव्हल एम्पायर सोसायटीमध्ये सुरू असलेल्या बांधकामाने नव्या वादाला तोंड फोडले आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

शिरूर शहरातील बहुचर्चित आणि वादग्रस्त अशा शिरूर-गोलेगाव रोडवरील माव्हल एम्पायर सोसायटीमध्ये सुरू असलेल्या बांधकामाने नव्या वादाला तोंड फोडले आहे. या ठिकाणी तब्बल २ हेक्टर ४८ गुंठे जमिनीवर सुरू असलेल्या बांधकामावर प्रांताधिकारी पूनम अहिरे यांनी थेट स्थगिती आदेश दिला असतानाही, बांधकाम बेधडकपणे सुरूच ठेवण्यात येत आहे. विशेष म्हणजे या जमिनीवर न्यायालयीन दावा सुरू असूनही ५० पेक्षा अधिक प्लॉट्स विकले गेले आहेत, आणि हे सगळं सुरू आहे प्रशासनाच्या आदेशाच्या पूर्णतः विरोधात.

या संदर्भात तक्रारदार परशुराम पाचर्णे यांनी गंभीर आरोप करत सांगितले की, नगरपरिषद आणि बांधकाम व्यावसायिकांनी प्रांतअधिकाऱ्यांच्या आदेशाला पूर्णतः दुर्लक्ष केले असून, नगरपरिषद ही या सगळ्या गैरप्रकारात सहभागी असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. त्यांनी ही जमीन नियमबाह्य पद्धतीने बिनशेतीमध्ये रूपांतरित झाल्याचा ठोस आरोप करत, याविरोधात अपील दाखल केले होते.

नागरिकांनी दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली असून, प्रकरणाचा तपास स्वतंत्र एजन्सीकडून करण्याची मागणीही जोर धरू लागली आहे. या पार्श्वभूमीवर न्याय मिळण्याच्या आशा पुन्हा पल्लवित होत असून, प्रशासनावर जनतेचा विश्वास पुन्हा निर्माण होईल का, हे येणाऱ्या काळात स्पष्ट होणार आहे.



### अनेक बड्या अधिकाऱ्यांवर कारवाईची शक्यता

» या प्रकारामुळे अनेक नागरिकांची फसवणूक झाली असून त्यांनी एन.ए. ऑर्डर आणि अधिकृत ले-आऊटची प्रत मिळवलेलीच नाही. ही अधिक धक्कादायक बाब आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात सामान्य नागरिक आर्थिकदृष्ट्या अडचणीत सापडले आहेत. या प्रकरणात नगरपरिषद, तहसिल कार्यालय आणि भूअभिलेख विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांचा सहभाग असल्याचे स्पष्ट संकेत मिळत असून, लवकरच अनेक बड्या अधिकाऱ्यांवर कारवाईची शक्यता निर्माण झाली आहे.

### नियम धाब्यावर बसवले ?

» यावर प्रांताधिकारी अहिरे यांनी "पुढील आदेश येईपर्यंत सर्व प्रकारचे कामकाज थांबवावे," असा स्पष्ट स्थगनादेश जारी केला होता. पाचर्णे यांनी पुढे सांगितले की, मंजूर ले-आऊटनुसार आयताकृती किंवा चौकोनी ओपन स्पेस राखणे बंधनकारक असताना येथे त्रिकोणी ओपन स्पेस दाखवण्यात आली. त्याचप्रमाणे १५% अमिनिटी स्पेस देणे आवश्यक असताना केवळ ५% जागा दाखवण्यात आली. म्हणजेच बिनधास्त नियम धाब्यावर बसवले गेले.

### लेखी अहवाल सादर करण्याचे आदेश

» इतक्यावरच न थांबता नगरपरिषद अभियंता आणि मुख्याधिकारी यांनी चुकीच्या नकाशाला मंजुरी दिली. हे या सगळ्या प्रकरणातील गांभीर्य अधिकच वाढवणारे आहे. तहसिल कार्यालयाने या वादग्रस्त ले-आऊटनुसार बिनशेती आदेश दिला आणि भूअभिलेख विभागाने पोटहिस्से करून ७/१२ उताऱ्यावर नोंदी घेतल्या. या प्रकारामुळे सारा दस्तऐवजच संशयाच्या भोवऱ्यात सापडला आहे. या पार्श्वभूमीवर प्रांताधिकारी अहिरे यांनी तहसिलदार व मुख्याधिकारी यांना सर्व संबंधित कागदपत्रांची सखोल पडताळणी करून लेखी अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

# पुणे-सोलापूर महामार्गाचा दर्जा घसरला

## रस्ता तीन आमदारांच्या कार्यक्षेत्रात असूनही या भागाकडे कोणीही लक्ष देत नसल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे-सोलापूर महामार्गावरील रस्त्याच्या कामाचा दर्जा दिवसेंदिवस घसरत चालला असून नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. विशेष म्हणजे, हडपसर ते उरुळी कांचन दरम्यानचा रस्ता तीन आमदारांच्या कार्यक्षेत्रात असूनही या भागाकडे कोणीही लक्ष देत नसल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे.

हडपसरचे आमदार चेतन तुपे, शिरूर-हवेलीचे आमदार माऊली कटके आणि पुरंदर-हवेलीचे आमदार विजय शिवतारे यांना या रस्त्याच्या दुरवस्थेकडे लक्ष देणे अत्यावश्यक आहे, असे नागरिकांचे म्हणणे आहे. ही पालखी मार्गावरील प्रमुख वाट असल्याने त्याला विशेष महत्त्व आहे, पण तरीही त्याकडे दुर्लक्ष झाल्याचे दिसून येते. मागील पंधरवड्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे महामार्गावर अनेक ठिकाणी मोठमोठाले खड्डे पडले आहेत. हवेली तालुक्यातील हडपसर, शेवाळेवाडी, मांजरी, लोणी काळभोर, कुंजीरवाडी, सोरतापवाडी, कोरेगाव मुळ आणि उरुळी कांचन या गावांतून दररोज शेकडो विद्यार्थी व नोकरदारवर्ग पुणे शहरात ये-जा करतो. मात्र, खराब रस्त्यांमुळे वाहनचालकांचे हाल होत आहेत.

शेवाळेवाडी येथील कुदळे कार ते लक्ष्मी कॉलनीपर्यंत सुमारे साडेतीन किलोमीटर अंतराचा रस्ता 2024 साली डांबरीकरणाच्या नावाखाली दुरुस्त करण्यात आला होता. परंतु,



काहीच दिवसांत या रस्त्यावर खड्डे पडू लागले. क्रशयुक्त डांबर उखडून गाड्यांना धक्का बसत आहे. पावसामुळे रस्त्याची चाळण झाली असून धुळीमुळे वाहनचालकांचे हाल होत आहेत. या रस्त्याचे काम इतके निकृष्ट दर्जाचे झाले आहे की, नागरिक विचारू लागले आहेत.

### टोलनाका बरा होता..

» याशिवाय कुंजीरवाडी, नायगाव फाटा, मधुबन कार्यालय, लोणी स्टेशन, थेऊर फाटा व इतर ठिकाणी खड्डे पडले असून केलेली डागडुजी केवळ औपचारिक ठरली आहे. जुन्या रस्त्याची अवस्था तुलनेने चांगली होती, आणि टोलनाका सुरु असताना तरी किमान रस्त्याचा दर्जा टिकून होता, असे अनेक नागरिक म्हणत आहेत. आज मात्र ठेकेदारांची बेफिकिरी आणि प्रशासकीय दुर्लक्ष यामुळे नागरिकांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे

" पुणे – सोलापुर हा राष्ट्रीय महामार्ग आहे. तीनही आमदार सत्ताधारी गटाचे असुन त्यांनी लक्ष देणे गरजेचे आहे. रस्त्याची सध्याची स्थिती पाहता तो एखाद्या गावचा रस्ता असल्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. सत्तेच्या धुंदीत राज्यकर्त्यांचे त्याकडे लक्ष नसल्याचे दिसून येत आहे. तरी लवकरात लवकर या महामार्गाचे काम हडपसर ते उरुळी कांचन पर्यंत होणे गरजेचे असुन टोल द्यावा लागला तरी चालेल; परंतु महामार्गाची गुणवत्ता टिकणे फार गरजेचे आहे.

**- स्वप्नील कुंजीर, शिवसेना ठाकरे गट संघटक**